मा.श्री. गोकुळ मवारे, भाप्रसे, जिल्हाधिकारी धुळे यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १०.०१.२०११ रोजी झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्त ( स्थळ  जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह धुळे )

---

सभेस उपस्थित असलेल्या सन्माननिय सदस्यांची यादी सोबत जोडली आहे.

प्रथम सदस्य सचिव तथा महाव्यवस्थापक जिउकें धुळे यांनी मा.अध्यक्ष यांचे व उपस्थितांचे स्वागत करुन .त्यांचे परवानगीने सभेच्या कामकाजास सुरुवात केली. मा. आमदार श्री.जयकुमार रावल यांचे सभागृहाच्या वतीने पुष्पगुच्छ देवुन स्वागत करण्यांत आले.

तदनंतर श्री नितीन बंग मुख्य प्रवर्तक खांदेश औ.विकास परिषद धुळे यांची उमविच्या सिनेटवर सदस्य म्हणुन निवड झाल्याबद्दल मा.अध्यक्ष यांनी व प्रादेशिक अधिकारी मऔविम धुळे व श्री मदन सुराणाजी यांचे शुभहस्ते श्री बंग यांचे पुष्पगुच्छ देवुन अभिनंदन करण्यांत आले.

| अ. क्र. | विषय | सभेतील चर्चा | संबंधीत विभाग |
|---|---|---|---|
| १ | मागील सभा दिनांक ०२.११.२०१० रोजी झालेल्या झुम सभेचे इतिवृत्त मंजुर करणे | मागील दि.०२.११.२०१० रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त पत्र क्र. ५०८० ते ५११९ दिनांक १५.११.२०१० नुसार सर्व सदस्यांना पाठविण्यांत आलेले असुन इतिवृत्तावर कोणाचाही वेगळा अभिप्राय नसल्याने सर्वानुमते मान्यता देण्यांत आली. | |
| २ | मागील सभेच्या इतिवृत्तानुसार प्रलंबित असलेल्या मुद्यांचा आढावा घेणेबाबत | | |
| १ | धुळे मऔविम क्षेत्रातील मुलभुत सुविधा – पाणी, रस्ते, पथदिवे इ. बाबत – सर्व औ.संघटना | नविन पाण्याची टाकीचा तसेच पाईपलाईन बदलवण्याचा २ कोटींचा प्रस्ताव मंजुरीसाठी अंतिम टप्प्यात असुन, रस्ते व पथदिवे दुरुस्ती प्रस्ताव व नविन फिडर इ. प्रस्तावांना वरिष्ठ कार्यालयाकडुन अद्याप मंजुरी मिळाली नसल्याचे का.अ. अभियंता यांनी सांगितले. या बाबत प्रा.अ. व का.अ.मऔविम धुळे यांनी प्रत्यक्ष उपमुख्य का.अ. मऔविम यांचेशी पाठपुरावा करावा व तसेच ग्रामीण ऐवजी नविन औद्योगिक फिडर कार्यान्वित करण्याची तात्काळ कार्यवाही का.अ. अभियंता मऔविम यांनी करावी या कामी अ.अ.महावितरण यांनीही सहकार्य करावे. तसेच खराब रस्त्याची तात्पुरते खाडडे बजवुन दुरुस्ती करावी असे मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | प्रा.अ. / का.अ. मऔविम धुळे |
| २ | सध्या मऔविम मध्ये उपलब्ध असलेले भुखंड, .त्यांची मागणी व विहीत मुदतीत बांधकाम पुर्ण न केलेले भुखंड परत घेणे बाबत – खांदेश औ.विकास परिषद | आता पर्यंत ७ भुखंडाचे पंचनामे करुन जी-५३ हा भुखंड ताब्यात घेतला असुन दोन महिन्यात ५ – ६ भुखंड ताब्यात घेण्यांत येणार असल्याचे प्रादेशिक अधिकारी मऔविम यांनी सांगितले. तसेच ज्या भुखंड धारकांचे पत्ते सापडत नाहीत अशा भुखंड धारकांची यादी औद्योगिक संघटनांना मऔविमने देवुन त्यांचे मदतीने सापडत नसलेल्या भुखंड मालकांना शोधुन पुढील कार्यवाही करावी. औ.क्षेत्रातील औद्योगिक वापराऐवजी गोडावुन म्हणुन शेडच्या वापराचे प्रमाण वाढलेले असल्याचे सर्व संघटनांनी सांगितले. या बाबत सविस्तर चर्चा होवुन अशा भुखंडाची माहिती औ.संघटनांनी प्रा.अ. मऔविम यांना द्यावी तसेच मऔविमने दोन महिन्यात गोडावुनसाठी वापर होत असलेल्या भुखंडाची माहिती सादर करावी असे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. | प्रा अ मऔविम धुळे / सर्व औ.संघटना |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | धुळे मऔविम क्षेत्रातील अतिक्रमण धारकांना भुखंड उपलब्ध करुन देणे बाबत - लघुउद्योग भारती | अंतिम ले आऊट तयार असुन मऔविम क्षेत्रात विविध ठिकाणी एकुण २१ भुखंड निश्चीत झाले आहेत. या बाबत सविस्तर चर्चा होवुन श्री मदन सुराणा सचिव डामा यांचेकडे असलेली ६० अतिक्रमण धारकांची यादी मऔविम कार्यालयाकडे देवुन क्रमवारी नुसार १ भुखंड दोन अर्जदारांना अशा रितीने २१ भुखंड ४२ अर्जदारांना तात्काळ वाटप करणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले | प्रा अ मऔविम धुळे |
| ४ | धुळे मऔविम वसाहत क्षेत्रात नविन भुखंड उपलब्ध करणे बाबत - सर्व संघटना | मऔविम क्षेत्रा शेजारी रावेर गावाच्या परिसरातील ६०० हेक्टर भु-संपादन प्रस्ताव उपविभागीय कार्यालयाकडे प्राप्त असुन जमीनी ताब्यात घेण्यासाठी येत असलेल्या अडचणी उपविभागीय अधिकारी यांनी सांगितल्या. २०० लोकांच्या सुनावण्या घेणे, सिमांकन करणे या बाबत विलंब होत असल्याचे सांगितले. मऔविम क्षेत्रा शेजारील सध्या १०० हेक्टर क्षेत्राबाबत खंडपीठाने निर्णय दिला असल्याने त्याप्रमाणे तेथील मिळेल तेवढी जमीन मऔविमला देता येणे शक्य असल्याचे सांगितले. या वर सविस्तर चर्चा होवुन मोजनीसाठी मऔविमला तात्काळ पत्र देवुन पुढील कार्यवाही करण्यांत यावी असे मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | उप विभागीय अधिकारी धुळे / प्रा.अ. मऔविम धुळे |
| ५ | धुळे शहरातील पारोळा रोड परिसरातील लघु उद्योग घटकांना अखंडीत विजपुरवठा मिळणे बाबत - लघु उद्योग भारती | या बाबत सर्व्हे झाला आहे, परंतु शहराचा झिरो लोड शेडींगचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर केला असल्यामुळे तुर्त सदर विषय सभेतुन वगळणेत यावा असे अ.अ.महावितरण यांनी सांगितले. | |
| ६ | मुंबई-आग्रा महामार्गावरील जकात नाक्यामुळे होत असलेल्या वाहतुकीच्या अडथळ्या बाबत - डामा धुळे | इतर शहरांप्रमाणे जकात नाका व वाहतुकीचे नियोजन करावे अशा यापुर्वीच मनपास सुचना दिलेल्या आहेत. सभेस कोणीही उपस्थित नसल्यामुळे केलेल्या कार्यवाही बाबत तपशिल सभागृहात मिळाला नाही. या बाबत पत्र देवुन अहवाल मागवावा असे मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | आयुक्त मनपा धुळे |
| ७ | मे महाराष्ट्र ऑईल एक्स्ट्रॅक्शन लि, ई-१४० एमआयडीसी धुळे या घटकाकडुन होत असलेल्या प्रदुषणा बाबत | सदर घटकाने जुना बॉयलर बंद केला असुन नविन बॉयलर बसवल्यामुळे आता प्रदुषण होत नसल्याने विषय वगळण्यात यावा मप्रनिम प्रतिनिधीने सांगितले | |
| ८ | प्रदुषण न करणा-या घटकांना महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाची परवानगी घेणे पासुन सुट देण्यात यावी - सर्व संघटना | सदर बाब धोरणात्मक असुन याबाबत काही परिपत्रक, सुचना असल्यास पुढील सभेपुर्वी अनुपालन सादर करणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | उप प्रा अ मप्रनिमं जळगांव |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | धुळे मऔविम क्षेत्रातील अतिक्रमण धारकांना भुखंड उपलब्ध करुन देणे बाबत - लघुउद्योग भारती | अंतिम ले आऊट तयार असुन मऔविम क्षेत्रात विविध ठिकाणी एकुण २१ भुखंड निश्चीत झाले आहेत. या बाबत सविस्तर चर्चा होवुन श्री मदन सुराणा सचिव डामा यांचेकडे असलेली ६० अतिक्रमण धारकांची यादी मऔविम कार्यालयाकडे देवुन क्रमवारी नुसार १ भुखंड दोन अर्जदारांना अशा रितीने २१ भुखंड ४२ अर्जदारांना तात्काळ वाटप करणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले | प्रा अ मऔविम धुळे |
| ४ | धुळे मऔविम वसाहत क्षेत्रात नविन भुखंड उपलब्ध करणे बाबत - सर्व संघटना | मऔविम क्षेत्रा शेजारी रावेर गावाच्या परिसरातील ६०० हेक्टर भु-संपादन प्रस्ताव उपविभागीय कार्यालयाकडे प्राप्त असुन जमीनी ताब्यात घेण्यासाठी येत असलेल्या अडचणी उपविभागीय अधिकारी यांनी सांगितल्या. २०० लोकांच्या सुनावण्या घेणे, सिमांकन करणे या बाबत विलंब होत असल्याचे सांगितले. मऔविम क्षेत्रा शेजारील सध्या १०० हेक्टर क्षेत्राबाबत खंडपीठाने निर्णय दिला असल्याने त्याप्रमाणे तेथील मिळेल तेवढी जमीन मऔविमला देता येणे शक्य असल्याचे सांगितले. या वर सविस्तर चर्चा होवुन मोजनीसाठी मऔविमला तात्काळ पत्र देवुन पुढील कार्यवाही करण्यांत यावी असे मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | उप विभागीय अधिकारी धुळे / प्रा.अ. मऔविम धुळे |
| ५ | धुळे शहरातील पारोळा रोड परिसरातील लघु उद्योग घटकांना अखंडीत विजपुरवठा मिळणे बाबत - लघु उद्योग भारती | या बाबत सर्व्हे झाला आहे, परंतु शहराचा झिरो लोड शेडींगचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर केला असल्यामुळे तुर्त सदर विषय सभेतुन वगळणेत यावा असे अ.अ.महावितरण यांनी सांगितले. | |
| ६ | मुंबई-आग्रा महामार्गावरील जकात नाक्यामुळे होत असलेल्या वाहतुकीच्या अडथळ्या बाबत - डामा धुळे | इतर शहरांप्रमाणे जकात नाका व वाहतुकीचे नियोजन करावे अशा यापुर्वीच मनपास सुचना दिलेल्या आहेत. सभेस कोणीही उपस्थित नसल्यामुळे केलेल्या कार्यवाही बाबत तपशिल सभागृहात मिळाला नाही. या बाबत पत्र देवुन अहवाल मागवावा असे मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | आयुक्त मनपा धुळे |
| ७ | मे महाराष्ट्र ऑईल एक्स्ट्रॅक्शन लि, ई-१४० एमआयडीसी धुळे या घटकाकडुन होत असलेल्या प्रदुषणा बाबत | सदर घटकाने जुना बॉयलर बंद केला असुन नविन बॉयलर बसवल्यामुळे आता प्रदुषण होत नसल्याने विषय वगळण्यात यावा मप्रनिम प्रतिनिधीने सांगितले | |
| ८ | प्रदुषण न करणाऱ्या घटकांना महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाची परवानगी घेणे पासुन सुट देण्यात यावी - सर्व संघटना | सदर बाब धोरणात्मक असुन याबाबत काही परिपत्रक, सुचना असल्यास पुढील सभेपुर्वी अनुपालन सादर करणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | उप प्रा अ मप्रनिमं जळगांव |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | नरडाणा ग्रोथ सेंटर मध्ये नविन पाईपलाईन टाकुन पाणी उपलब्ध करुन देणे व अविकसीत मुखंड ताब्यात घेणे बाबत | नरडाणा मऔविम क्षेत्रात फक्त २ घटकांनी उत्पादन सुरु केलेले आहे. जुनी सिमेंट पाईपलाईन खराब असल्यामुळे नविन पाईपलाईन टाकणेस लवकरच सुरु होणार असुन इतर भुखंड धारकांनी अद्याप भुखंड विकासाचे दृष्टिने काहीही कार्यवाही केलेली नसल्याचे सांगितले. यावर मा. आमदार श्री.जयकुमार रावल, यांनी वाटप झालेले भखुड विकसीत न झाल्याने तिव्र नाराजी व्यक्त करुन मुदत संपलेल्या भुखंड धारकांनाकडुन तीन महिन्याचे आंत भुखंड परत घेवुन ते इतर गरजु उद्योजकांना द्यावेत असे सांगितले. या बाबत सविस्तर चर्चा होवुन नरडाणा औद्योगिक क्षेत्राचा विकासासाठी मऔविमने तात्काळ कार्यवाही करावी असे मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | मऔविम धुळे |
| १० | अंध अपंग मतिमंद बेरोजगारांसाठी प्रशिक्षण व विशेष अर्थ सहाय्य देणे बाबत विचार व्हावा- | मागील सभेत ठरल्याप्रमाणे अंध, अपंग, मतिमंद बेरोजगारांना उद्योजकता विकास प्रशिक्षण देण्याचे दृष्टिने औद्योगिक संघटनांनी सविस्तर प्रस्ताव व लाभार्थ्यांची यादी द्यावी म्हणजे कार्यक्रमांचे नियोजन करणेत येईल असे सदस्य सचिव यांनी सांगितले. | औ.संघटना / जिउकें |
| ११ | नाशिक महसुल आयुक्तांचे अध्यक्षतेखाली धुळे नंदुरबार जळगांव जिल्हयाची स्वतंत्र सभा आयोजना बाबत | मा उद्योग सह संचालक नाशिक विभाग यांचे मार्फत मा.विभागीय आयुक्त नाशिक यांचेकडुन सभेची दिनांक व वेळ निश्चीत करणे बाबत प्रस्ताव सादर केला असल्याचे सदस्य सचिव यांनी सांगितले. या बाबत मा.अध्यक्ष यांनी सांगितले की, ते स्वतः तारीख व वेळ मिळणेसाठी पाठपुरावा करणार आहेत. | |
| १२ | मऔविम क्षेत्रातील ईएसआय दवाखान्यात सुविधा मिळणे बाबत व ईएसआयचा फायदा घेतलेल्या सभासदांसाठी शासकीय रुग्णालयात विशेष व्यवस्था होणे बाबत- खांदेश औविप | ईएसआयचे प्रतिनिधी सभेस उपस्थित नसल्याचे चर्चा झाली नाही. औद्योगिक संघटनांच्या अडचणी सोडवण्यासाठी ईएसआय अधिकारी व औद्योगिक संघटनांची बैठक महाव्यवस्थापक जिउकें धुळे यांनी आयोजीत करुन पुढील सभेपुर्वी अहवाल सादर करण बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले. | जिउकें धुळे / औ संघटना |
| १३ | मे.किरण लॅब प्लास्ट, ए-३ उद्योगनगर सह संस्था – घटका समोरील अतिक्रमणा बाबत | या बाबत सविस्तर चर्चा होवुन दिनांक १२.०१.२०११ रोजी सदर भुखंडासमोरील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करावी, त्यासाठी जेसीबी, ट्रॅक्टर, मजुर घटक उपलब्ध करुन देईल तर त्यासाठी खर्च मऔविम यांनी करुन अतिकमण काढणेत यावे. यासाठी मऔविमने आवश्यक तेवढी पोलीस बंदोबस्ताची व्यवस्था करावी. | का अ मऔविम धुळे |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | ए-१० मुखांडावरील अतिक्रमण काढुन मुखंड हस्तांतरण करुन मिळणे बाबत- अध्यक्ष उद्योगनगर सह संस्था धुळे - | सदर मुखांडावर झालेले अतिक्रमण तात्काळ काढण्यात यावे तसेच मुखंड उद्योग नगर सहकारी संस्थेला हस्तांतरीत करण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी असे मा.अध्यक्ष यांनी सांगितले. | प्रा अ / का अ एमआय डी सी धुळे |

आयत्या वेळच्या विषयावर चर्चा करणे -

डीएमआयसी प्रकल्पाचा आढावा घेणे -

डीएमआयसी प्रकल्पा बाबत प्रादेशिक अधिकारी मऔविम यांनी सांगितले की, डीएमआयसी फेज-१ सोनगीर, देवभाने, बळसाने, लामकानी या परिसरातील जवळ जवळ ४००० हेक्टर जागा निश्चीतीचा प्रस्ताव सादर केलेला आहे. .त्यात वन विभागाच्या जमिनीचा कोठेही समावेश नाही. सदर नियोजीत जागा ही धुळे शहरापासुन २०-२५ कि.मी.वर असुन वाहतुकीच्या दृष्टिने सोईची आहे. या बाबत मा.श्री जयकुमार रावल, आमदार यांनी सांगितले की, नरडाणा येथे रेल्वेची सोय असुन राष्ट्रीय महामार्ग ३ वर असुन जवळच तापी नदी असल्याने ' नरडाणा - सरवड परिसरातील पडीक जमीनीचाही भुसंपादनाच्या दृष्टिने विचार व्हावा, म्हणजे नरडाणा औद्योगिक विकास केंद्रामधील उद्योजकांनाही चालना मिळेल, तसेच नरडाणा हे भविष्यात भुसावळ सारखे महत्वाचे रेल्वेस्टेशन होवु शकते, वनविभागाने विनाकारण अडकुन ठेवलेल्या जमीनीबाबत आमदार महोदयांनी तिव्र नाराजी व्यक्त केली.

या बाबत सविस्तर चर्चा होवुन प्रादेशिक अधिकारी यांनी आता फेज-१ चा प्रस्ताव अंतिम झालेला उच्च स्तरीय समितीकडे सादर झाला २०१२ अखेर जमीनी ताब्यात मिळतील असे सांगितले तसेच फेज-२ साठी नरडाणा परिसरातील जमिनींचा डीएमआयसी प्रकल्पासाठी निश्चीत विचार करण्यात येईल असे सांगितले. डीएमआयसी प्रकल्पा बाबत माहिती देण्यासाठी प्रादेशिक अधिकारी मऔविम यांनी उद्योजकांची बैठक आयोजीत करणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सुचीत केले.

जिल्हा पुरस्कार योजना २०१० -

या बाबत सदस्य सचिव यांनी सांगितले की, जिल्हा पुरस्कार २०१० साठी अर्ज स्विकारण्याची कार्यवाही जिल्हा उद्योग केंद्राने सुरु केलेली आहे, तरी जास्तीत जास्त उद्योजकांनी सदर पुरस्कारासाठी अर्ज करावेत, म्हणजे आलेल्या अर्जांची छाननी करुन पुढील सभेपुर्वी निवड प्रक्रिया पुर्ण करण्यांत येवुन मा.अध्यक्ष यांना अंतिम अहवाल सादर करण्यांत येईल. असे सांगितले.

श्री नितीन बंग, मुख्य प्रवर्तक यांनी उमवि सिनेट सदस्य म्हणुन निवड झाली असुन त्यांच्या मदतीने उद्योजकीय प्रशिक्षणा बाबत विद्यापीठामार्फत वेगवेगळे प्रशिक्षण अभ्यासक्रम महाविद्यालयातुन सुरु करता येतील श्री मदन सुराणा सचिव डीमा यांनी सांगितले. या बाबत मा.अध्यक्ष यांनी सांगितले की, नियोजन मंडळाच्या मदतीने यापुर्वीच टेक्सटाईल्स सारखे कोर्स आयटीआयच्या मदतीने सुरु केले आहे. अशा प्रकारचे आणखी काही कोर्स असतील तर औद्योगिक संघटनांनी जिल्हा नियोजन अधिकारी धुळे यांचे कडे तसे प्रस्ताव असल्यास सादर करावेत, म्हणजे निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करणे येईल.

मा.श्री. जयकुमार रावल, आमदार यांची धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेवर संचालक म्हणुन बिनविरोध निवड झाल्याबद्दल सर्व सदस्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

शेवटी सदस्य सचिव यांनी मा.अध्यक्ष व उपस्थितांचे आभार मानुन मा.अध्यक्ष यांचे परवानगीने सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

सही/-
महाव्यवस्थापक
तथा सदस्य सचिव
जिल्हा उद्योग केंद्र धुळे

सही/-
**मा.अध्यक्ष तथा**
**जिल्हाधिकारी धुळे**

मा.श्री. गोकुळ मवारे, भाप्रसे, जिल्हाधिकारी धुळे यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १०.०१.२०११ रोजी झालेल्या जिल्हा उद्योग मित्र, स्थानिक लोकांना रोजगारात प्राधान्य, आजारी उद्योग पुनरुज्जीवन समिती सभेस उपस्थित सदस्य ( स्थळ – जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह धुळे )

---

मा.सर्वश्री

१. मा.श्री.गोकुळ मवारे, भाप्रसे, जिल्हाधिकारी धुळे — अध्यक्ष
२. मा.श्री.जयकुमार रावल, आमदार शिंदेखेडा — सदस्य
३. अरुण आनंदकर प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी धुळे
४. टी डी हुळवले उपविभागीय अधिकारी धुळे
५. वाय जे बोडरे कार्यकारी अभियंता एमआयडीसी धुळे
६. मदन सुराणा सचिव डिमा धुळे
७. सतीश सिंगवी उपाध्यक्ष डिमा धुळे
८. अशोक मानुशाली खजिनदार डामा धुळे
९. नितीन बंग, मुख्य प्रवर्तक खांदेश औद्योगिक विकास परिषद धुळे
१०.मनोज तायडे, संचालक डामा धुळे
११.मनेश थोरात सचिव लघु उद्योग भारती धुळे
१२.य ग वाघ सहाय्यक विद्युत निरिक्षक धुळे
१३.श्री व कुलकर्णी प्रतिनिधी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य धुळे
१४.देवेंद्रसींग राजपुत, अध्यक्ष लघु उद्योग भारती धुळे
१५.प्रशांत मोराणकर उपाध्यक्ष लघु उद्योग भारती धुळे
१६.राजेंद्र जाखडी लघु उद्योग भारती धुळे
१७.सुभाष कांकरीया लघु उद्योग भारती धुळे
१८.के एस परदेशी अ.अ. महावितरण कंपनी धुळे
१९.आर सी रामोळे जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी धुळे
२०.जगन्नाथ पाटील जिल्हा माहिती अधिकारी धुळे
२१.वि गो मोरे नगर रचना कार्यालय प्रतिनिधी धुळे
२२.डी टी पटेल विक्रीकर अधिकारी धुळे
२३.आर एस बहिरम एमआयडीसी धुळे
२४.टी डी बडगुजर उपअभियंता एमआयडीसी धुळे
२५.सी डी मारुळे क्षेत्र व्यवस्थापक एमआयडीसी धुळे
२६.आशिष किशोर पाटील, चेअरमन उद्योगनगर सहकारी संस्था धुळे
२७.आर ए राजपुत उपप्रादेशिक अधिकारी मप्रनि मंडळ जळगांव
२८.टी ए ठाकरे क्षेत्र अधिकारी मप्रनि मंडळ जळगांव
२९.आर पी मदाणे अग्रणी जिल्हा प्रबंधक सेंट्रल बँक ऑफ इंडिया धुळे
३०.एस के जाधव प्रतिनिधी जिल्हा व्य शि व प्र कार्यालय धुळे
३१.श्रीमती अ वि उशिरे एमएसएसआयडीसी धुळे
३२.अजय भंडारी मालक किरण लॅब उद्योगनगर सहकारी संस्था धुळे
३३.एस ए मरचंडे व्यवस्थापक जिउकें धुळे
३४.सतिश भामरे, महाव्यवस्थापक जिउकें धुळे — सदस्य सचिव

०००